Gifts / Hiba

Under muslim law





डॉ. संजय कुंडेटकर

उपजिल्हाधिकारी (नि.)

बी.ए., एन.डी., एम.बी.ए.,एम.डी.,
डी.मॅग., पीएच.डी.

WEB SITE: https://www.drdcsanjayk.info/?m=1

YouTube Channel: https://www.youtube.com/c/MahsulGuru

Telegram Channel: https://t.me/mahsulguru

Blog: drdcsanjayk.blogspot.com

'हिबा' (Hiba) – मुस्लिम व्यक्तिगत कायद्यान्वये बक्षीस

'हिबा' (Hiba) म्हणजे मुस्लिम व्यक्तीने स्वत:च्या मालकीची मालमत्ता कोणताही मोबदला न घेता, स्वेच्छेने व तात्काळ दुसऱ्या व्यक्तीला प्रदान करणे होय.

सोप्या भाषेत, मुस्लिम कायद्यानुसार 'हिबा' म्हणजे जीवंतपणी दिलेले बक्षीस (Gift during lifetime).

'हिबा' ही मुस्लिम वैयक्तिक कायद्यातील महत्त्वाची संकल्पना असून तिचा संबंध मालमत्तेच्या विनामोबदला हस्तांतरणाशी आहे.

'हिबा' म्हणजे मालमत्तेचे असे हस्तांतरण ज्यामध्ये *एका हयात व्यक्तीकडून दुसऱ्या हयात व्यक्तीकडे* मालमत्तेची मालकी हस्तांतरित होते.

- अनेक न्यायालयांनी, मुस्लिम वैयक्तिक कायद्यातील 'हिबा' बाबतचे नियम वाजवी वर्गीकरणावर आधारीत आहेत आणि मुस्लिम समाजाने 'हिबा' बाबतच्या नियमांचे अनुपालन केल्यामुळे कोणत्याही प्रकारचा भेदभाव होत नाही या आशयाचे निकाल दिले आहेत.
- 'हिबा' या प्रकाराला कायद्यानुसार 'व्यवहार' (transaction) मानले जाते, मुस्लिम कायदा 'हिबा' (gift) ला कराराच्या कायद्याचा भाग (part of contract law) मानतो कारण 'हिबा' साठी काही अटींची पूर्तता होणे अनिवार्य असते.

'हिबा' साठी पात्रता:

■ दाता (donor) :

♦ सज्ञान (adult) असावा: त्याचे वय अठरा वर्षापेक्षा जास्त असावे. तो जर न्यायालयाने नेमलेल्या पालकाच्या देखरेखीखाली असेल तर वयाच्या एकवीस वर्षानंतर त्याला सज्ञान समजण्यात येते. अज्ञान व्यक्तीने दिलेला 'हिबा' अवैध ठरेल.

♦ तो स्वस्थचित्त (of sound mind) असावा: वेडसर माणसाला तो करत असलेल्या कामाचे कायदेशीर परिणाम कळत नाहीत. तथापि, वेडसर व्यक्तीने वेडाच्या भरात नसतांना (lucid interval) दिलेला 'हिबा' वैध ठरेल कारण या कालावधीत तो सामान्य व्यक्ती असतो आणि त्याला तो करत असलेल्या कामाचे कायदेशीर परिणाम ज्ञात असतात. परंतु प्रसंगी तसे पुराव्यासह सिध्द करावे लागेल.

अज्ञान किंवा वेडसर व्यक्तीच्या लाभात 'हिबा' करावयाचा असल्यास, त्याचा स्वीकार खाली अग्रक्रमाने दर्शविलेल्या 'मालमत्ता पालक' (guardian of the property) व्यक्ती करू शकतात.

अ) वडील ब) वडीलांचा व्यवस्थापक

क) वडीलांचे वडील ड) वडीलांच्या वडीलांचा व्यवस्थापक

तथापि, अ) च्या उपस्थितीत, ब) अथवा क) किंवा ड) 'हिबा' चा स्वीकार करू शकणार नाही. वरील अग्रक्रमाचे काटेकोरपणे पालन व्हावे.

- मुस्लिम कायद्यान्वये आईला "मालमत्ता पालक" चा दर्जा नाही. त्यामुळे आई अज्ञान किंवा वेडसर व्यक्तीच्या लाभात केलेला 'हिबा' चा स्वीकार करू शकत नाही.

♦ **तो मुस्लिम धर्मिय (Muslim) असावा:** 'हिबा'ची घोषणा करणारा पुरूष किंवा स्त्री दाता (donor) मुस्लिम धर्मिय असावा. तो मुस्लिम धर्मिय नसेल तर असे बक्षीस 'हिबा' ठरणार नाही आणि मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १८८२ च्या तरतुदींना पात्र ठरेल.

तथापि, 'हिबा' नंतर एखाद्या मुस्लिम व्यक्तीने मुस्लिम धर्माचा त्याग केला तरी, त्याने मुस्लिम धर्मिय असतांना दिलेला 'हिबा' अंमलात राहील.

♦ **त्याचा मालकी हक्क (Right) असावा:** ज्या मालमत्तेचा 'हिबा' दिला जात आहे त्या मालमत्तेवर 'हिबा' देणाऱ्या पुरूष किंवा स्त्री दात्याचा (donor) पूर्णत: वैध व कायदेशीर अधिकार/हक्क असावा.

स्वत:च्या मालकीची नसलेली किंवा अवैध पध्दतीने संपादन केलेल्या मालमत्तेचा 'हिबा' देता येत नाही तसेच मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १८८२, कलम ६ *(काय हस्तांतरित करता येईल)* अन्वये नमूद गोष्टींचाच 'हिबा' देता येईल. कोणत्याही कायद्यान्वये हस्तांतरणास प्रतिबंधीत वस्तूंचा 'हिबा' देता येणार नाही.

- 'हिबा' देणारा, दाता (donor) विवाहीत किंवा अविवाहीत असू शकेल.
- 'हिबा' फक्त हयात/जीवंत व्यक्तीच्याच लाभात देता येतो. मयत व्यक्तीच्या नावे 'हिबा' देता येत नाही.

- **अदाता (Donee) (ज्याच्या लाभात हिबा करण्यात येत आहे):**

♦ **कायद्याने स्थापित व्यक्ती (Juristic Person) असावा: म्हणजे कायद्याद्वारे स्थापन झालेले महामंडळ, नोंदणीकृत संस्था, विद्यापीठ, शाळा, मस्जिद इत्यादी. यांचे जैविक अस्तित्व नसले तरीही कायदा यांना व्यक्ती (person) मानतो. कायद्यानुसार 'व्यक्ती' या संज्ञेत फक्त जैविक व्यक्तीच नव्हे तर कायद्याने स्थापित व्यक्तींचाही समावेश होतो. कायद्याने स्थापित व्यक्ती या सज्ञान (adult) आणि स्वस्थचित्त (of sound mind) मानल्या जातात. अशा कायद्याने स्थापित व्यक्तींच्या लाभात केलेला 'हिबा' वैध असतो. अशा 'हिबा' चा स्वीकार, संबंधित संस्थांचे प्रबंधक किंवा सक्षम अधिकारी करतात.**

♦ **गर्भस्थ आपत्य (Child in Womb):** गर्भात असलेल्या आपत्याच्या लाभात 'हिबा' करता येतो. यावेळी प्रमुख अट आहे की, असे आपत्य 'हिबा' करतांना आईच्या गर्भात जीवंत असावे आणि ते 'हिबा' दिल्याच्या दिनांकापासून (सुन्नी पंथात) सहा महिन्याच्या आत, (शिया पंथात) दहा महिन्याच्या आत जीवंत जन्मले पाहिजे.

गर्भस्थ आपत्य जरी अस्तित्वात नसले तरी कायदा त्याला जीवंत व्यक्ती मानतो. असे आपत्य जर कोणत्याही कारणामुळे जीवंत जन्मले नाही किंवा 'हिबा' करतांना आईच्या गर्भात जीवंत नसेल तर असा 'हिबा' रद्द/अवैध ठरेल.

- 'हिबा' चा लाभार्थी (ज्याला 'हिबा' मिळणार आहे ती व्यक्ती) कोणत्याही धर्माची, लिंगाची, वयाची किंवा मानसिकतेची असू शकेल. मुस्लिम धर्मिय व्यक्तीला, हिंदू, ख्रिश्चन किंवा अन्य बिगर मुस्लिम व्यक्ती, पुरूष, स्त्री, अज्ञान व्यक्ती, वेडसर व्यक्तीच्या हक्कात 'हिबा' करता येईल.

- मुस्लिम कायद्यान्वये 'हिबा' देणाऱ्या आणि घेणाऱ्या व्यक्तींनी खालील गोष्टी करणे अनिवार्य आहेत.

१) घोषणा (Declaration): ज्याने हिबा द्यायचे ठरविले आहे (donor) त्याने, तो कोणाला आणि काय बक्षीस देत आहे याची 'घोषणा' करणे अनिवार्य आहे. ही घोषणा स्वेच्छेने आणि स्पष्ट शब्दात असावी. संदिग्ध शब्दात (ambiguous words) केलेली घोषणा अवैध ठरते. तसेच धमकीमुळे किंवा बळजबरीमुळे अथवा अयोग्य, अनधिकृत प्रभावाखाली किंवा फसवणूक करून दिलेला/घेतलेला 'हिबा' अवैध ठरतो.

२) स्वीकार (Acceptance): ज्याला असे बक्षीस/हिबा मिळणार आहे (donee) त्याने 'हिबा' चा स्वीकार केला पाहिजे.

३) हस्तांतरण/ताबा (Transfer of Possession): ‘हिबा’ देणाऱ्याने, ‘हिबा’ दिलेल्या मालमत्तेचा ताबा, ज्याच्या लाभात ‘हिबा’ देण्यात आला आहे त्याच्याकडे तत्काळ हस्तांतरीत केला पाहिजे.

४) त्याग (relinquishment): 'हिबा' दिल्यानंतर, दात्याने (donor), 'हिबा' दिलेल्या मिळकतीतील स्वत:चा अधिकाराचा, हितसंबंधाचा, मालकीचा त्याग केला पाहिजे. असे न झाल्यास (काही अपवाद वगळता) सदर 'हिबा' अवैध ठरेल.

■ उक्त ४) (त्याग) साठी अपवाद:

१) जर पतीने पत्नीला किंवा पत्नीने पतीला राहत्या घराचा 'हिबा' दिलेला असेल तर.

२) जर 'हिबा' देणार व घेणार हे एकमेकांशी प्रतिबंधित नातेसंबंधांनी संबंधित असतील तर.

३) जर 'हिबा' *'सदका'* म्हणून (धार्मिक कामासाठी) दिला असेल तर.

४) जर 'हिबा' घेणार (donee) मयत झाला असेल तर.

५) जर 'हिबा' म्हणून स्वीकारलेली वस्तू, 'हिबा' घेणार (donee) याने विकल्यामुळे, बक्षीस दिल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे त्याच्या ताब्यातून निघून गेली असेल तर.


६) जर 'हिबा' म्हणून दिलेली वस्तू गहाळ/नष्ट झाली असेल तर.

७) जर कोणत्याही कारणामुळे 'हिबा' म्हणून दिलेल्या वस्तूचे मूल्य वाढले असेल तर.

८) जर 'हिबा' म्हणून दिलेल्या वस्तुचे स्वरूप ओळखता येणार नाही इतके बदलले असेल तर. (उदा. गव्हाचे पीठात रूपांतर होणे)

९) जर दात्याने (donor) 'हिबा'च्या बदल्यात काही मोबदला स्वीकारला असेल तर.

- दात्याने (donor) 'हिबा' चा ताबा देण्याआधी केवळ घोषणा (declaration) केली असेल 'हिबा' कधीही रद्द केला जाऊ शकतो. परंतु ताबा दिल्यानंतर फक्त न्यायालयाच्या हुकूमनाम्यानेच 'हिबा' रद्द होऊ शकतो.
- 'हिबा' चे किमान दोन साक्षीदार असावे.
- 'हिबा'च्या बदल्यात कोणताही मोबदला अपेक्षीत नाही.
- मुस्लिम धर्मिय व्यक्ती, जर मृत्युशय्येवर (Deathbed) असेल तर, त्याला त्याच्या संपूर्ण मिळकतीपैकी (दफन विधीचा खर्च वगळून) फक्त १/३ मिळकतीचाच 'हिबा' करता येईल. जर त्याने संपूर्ण मिळकतीचा हिबा केला तर त्याच्या सर्व वारसांची परवानगी आवश्यक असेल.



CHAPTER X

DEATH-BED GIFTS AND ACKNOWLEDGMENTS

135. Gift made during marz-ul-maut.— A gift made by a Mahomedan during *marz-ul-maut* or death-illness cannot take effect beyond a third of his estate after payment of funeral expenses and debts, unless the heirs give their consent, after the death of the donor, to the excess taking effect; nor can such a gift take effect if made in favour of an heir unless the other heirs consent thereto after the donor's death *(a)*.

Explanation.— A *marz-ul-maut* is a malady which induces an apprehension of death in the persons suffering from it and which eventually results in his death.

- **एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे 'हिबा':** एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे किंवा व्यक्ती समूहाच्या लाभात 'हिबा' देता येऊ शकेल. परंतु त्या सर्वांची एकमेकांशी ओळख असावी आणि प्रत्येकाचा हिस्सा (share) स्वंत्रपणे ठरविण्यात आलेला असावा तसेच त्या सर्वांनी वैयक्तिकरित्या 'हिबा' चा स्वीकार करावा.

- **'हिबा'चा दस्त नोंदणीकृत असावा का?**

याबाबत बराच संभ्रम आहे. विविध न्यायालयांनी याबाबत परस्पर विरोधी मते व्यक्त केलेली आहेत.

मुस्लिम कायद्यान्वये 'हिबा' हा तोंडीसुध्दा असू शकतो. त्यामुळे तोंडी 'हिबा' नोंदणीकृत असावा असे बंधन नाही.

- **मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२, कलम १२९ अन्वये, या कायद्यातील प्रकरण सात मधील दान (gift) बाबतच्या तरतुदी मरणाशंक दान** (Gift in Contemplation of Death / Marz-ul-Maut) **किंवा मुस्लिम कायद्याला लागू होत नाहीत अशी तरतूद आहे. त्यामुळे लेखी 'हिबा' नोंदणीकृत असावा असे बंधन नाही.**

- **हिबाचा दस्त मुस्लिम कायद्यानुसार एक भेट आहे - मालमत्ता हस्तांतरण कायद्याचे कलम १२३ अन्वये हिबाचा दस्त अनिवार्यपणे नोंदणी योग्य नाही - मुल्लाच्या तत्त्वांन्वये, मुस्लिम देणगीदाराने लेखी स्वरूपात केलेली भेट अनिवार्यपणे नोंदणी करण्या योग्य नाही**

- हिबाचा दस्त देणगीदाराच्या घोषणेचे स्वरूप आहे, याद्वारे तिन्ही आवश्यक बाबी पूर्ण झाल्यामुळे सदर भेट पूर्ण आणि अपरिवर्तनीय बनते.

(संदर्भ: मा. सर्वोच्च न्यायालय, अब्दुल रहीम गुड्डू, अब्दुल मजीद वि. शेख कय्युम/शेख रशीद, रिट याचिका क्र. १८४३२००९, दि. १०.११.२००९)

- मुस्लिम कायद्यानुसार, भेटवस्तूची घोषणा आणि स्वीकृती ही मौखिक असू शकते. जिथे भेटवस्तू लिखित स्वरूपात दिली जाते, त्याला 'हिबानामा' म्हणतात.

'हिबानामा' चा दस्त स्टॅम्प-पेपरवर असणे आवश्यक नाही आणि ते प्रमाणित किंवा नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.

(संदर्भ: मा. सर्वोच्च न्यायालय, इलाही समसुद्दीन विरुद्ध जैतुनबी मकबुल)

- **Gift under Muslim Law is not required to be in writing and consequently need not be registered under the Registration Act. A gift to be complete, there should be a declaration of the gift by the donor, acceptances of the gift, express or implied, by or on behalf the donee, and delivery of possession of the property the subject matter of the gift by the donor to the donee. The donee should take the delivery of possession of the property either actually, or constructively. Only on the proof of these essential conditions, the gift becomes complete and valid.**

(Supreme Court - Mehboob Sahab v. Syed Ismail)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२ २२०४८३५५ Email ID :-j1a.revenue@maharashtra.gov.in

क्र.जमीन -२०२३/प्र.क्र.१८६/ज-१अ दि. २५/११/२०२४

प्रति,
१. विभागीय आयुक्त, पुणे.
२. जिल्हाधिकारी, रायगड.

विषय : मुस्लीम व्यक्तीगत कायद्यांतर्गत हिबा नामाची नोंद होणेबाबत.
संदर्भ : १.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख व (म.राज्य), पुणे यांचे क्र. रा.भू४/अनोंदणीकृत नोंदी/ कावि-९०२/२०२२, दि.२०/१२/२०२२.
२.अर्जदार श्री. सलीम शेख यांचे दि.२७/०५/२०२२ चे पत्र व सहपत्र.
३. विभागीय आयुक्त, पुणे यांचे क्र. मह/२/जमिन जनरल/कावि/२२५/२०२४ दि.१७/१०/२०२४ चे पत्र.
४. जिल्हाधिकारी, रायगड यांचे क्र. कुळवहिवाट/टि-३/६२३०९/हिबानामा/ १३९२१३१/२०२४, दि.२३/०८/२०२४ चे पत्र.

उपरोक्त विषयावरील उक्त नमूद संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाकडे अभिप्राय घेण्याकरिता विनंती केली होती. त्याप्रमाणे, प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाकडून पुढील प्रमाणे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

..... Thus, in view of the legal position settled in the above judicial pronouncements, it can be said that the provisions of the Transfer of Property Act, 1882 do not applicable to gift under the Mohammedan Law. The rules of Mohammedan Law do not make writing essential to the validity of a gift. An oral gift if fulfilling all the three essentials i.e. (1) declaration of the gift by the donor; (2) acceptance of the gift by the donee and (3) delivery of possession makes the gift complete and irrevocable. Such gift may not be required to be registered. Thus, if a person has reported orally or in writing that he has acquired the right in land by the mode of oral gift (Hiba) or unregistered gift-deed (Hibanam), by the virtue of the provisions of Section 149 (Acquisition of Right to be Reported) of MLRC, 1966, it

is for concerned Talathi to give such person a written acknowledgement of such report. Therefore, the perception of the Revenue and Forest Department that on the basis of an oral gift (Hiba) and an unregistered gift-deed (Hibanam) of the property valued at more than Rs. 100/-, mutation entry cannot be recorded in record of right of the property is not acceptable and does not appear to be correct.

०२. तरी, मुस्लीम व्यक्तीगत कायद्यांतर्गत हिबा नामाची नोंद होणेबाबतच्या प्रकरणांवर विधी व न्याय विभागाने दिलेल्या उक्त नमूद अभिप्रायाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर प्रकरणपरत्वे उचित कार्यवाही करण्याची आपणांस विनंती आहे.

आपला,

(शुभम बोबडे)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

सोबत:- उक्त संदर्भाधीन पत्रे.

प्रत-

१. सर्व विभागीय आयुक्त यांना आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय कार्यालायांना निदर्शनास आणून देण्याकरीता.
२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख व (म.राज्य), पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. अर्जदार श्री सलिम शेख, ऑफिस नं. पहिला मजला, ईस्ट स्ट्रीट गॅलेरिया, २४२१, ईस्ट स्ट्रीट कॅम्प पुणे- ४११००१.

मराठी अनुवाद

अशाप्रकारे, वरील न्यायिक निर्णयांमध्ये निश्चित केलेली कायदेशीर स्थिती पाहता, असे म्हणता येईल की, मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ मधील तरतुदी मुस्लिम कायद्यांतर्गत भेटवस्तूंना लागू होत नाहीत. मुस्लिम कायद्याच्या नियमांन्वये भेटवस्तूच्या वैधतेसाठी लेखी दस्तऐवज आवश्यक नाही. मौखिक भेट जर खालील तिन्ही आवश्यक गोष्टी पूर्ण करत असेल तर अशी भेट पूर्ण आणि अपरिवर्तनीय बनते.

(१) भेटवस्तू देणाऱ्याकडून भेटवस्तू देण्याची घोषणा

(२) भेटवस्तू स्वीकारणाऱ्याकडून भेटवस्तूचा स्वीकार आणि

(३) भेटवस्तूचा ताबा देणे.

अशा भेटवस्तूंची नोंदणी करणे आवश्यक नाही. अशाप्रकारे, जर एखाद्या मुस्लिम धर्मिय व्यक्तीने तोंडी किंवा लेखी कळवले असेल की, त्याने मौखिक भेट (हिबा) किंवा अनोंदणीकृत बक्षीसपत्रा (हिबानामामा) द्वारे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम १४९ (हक्क संपादन) च्या तरतुदींन्वये एखाद्या मालमत्तेवर हक्क संपादन केला आहे तर संबंधित ~~तलाठ्याने~~ ग्राम महसूल अधिकाऱ्याने अशा व्यक्तिला त्याबाबत लेखी पोहोच द्यावी.

सबब, मौखिक भेटवस्तू (हिबा) आणि नोंदणीकृत नसलेल्या बक्षीसपत्राच्या (हिबानामा) च्या आधारे रु. १००/- (रु. शंभर) पेक्षा जास्त किमतीच्या मालमत्तेची फेरफार नोंद नोंदविता येणार नाही अशी जी महसूल आणि वन विभागाची धारणा आहे ती बरोबर असल्याचे दिसत नाही.

■ ग्राम महसूल अधिकारी स्तरावरून अपेक्षीत कार्यवाही:

शासनाच्या वरील पत्रानुसार हिबानामाची फेरफार नोंद नोंदवितांना, मुस्लिम कायद्यातील हिबानामा संबंधीच्या सर्व अटींची पूर्तता झाली आहे किंवा नाही याबाबत खात्री करणे ग्राम महसूल अधिकारी यांचे कर्तव्य आहे.

हिबानामाची नोंद करताना ग्राम महसूल अधिकारी यांनी हिबानामा करून देणार आणि हिबानामाचा लाभार्थी यांना नोटीस बजावून समक्ष हजर ठेवून दोघांकडून हिबानामाच्या तिन्ही अनिवार्य अटींची पूर्तता झाली आहे याबाबत जबाब नोंदवून घेणे आवश्यक ठरेल.

म्हणजेच:

♦ हिबानामा करून देणार याच्याकडून, त्याने हिबानामा करतांना,

(१) हिबानामा संबंधित भेटवस्तू देतांना त्याबाबत घोषणा केली होती.

(२) हिबानामाशी संबंधित भेटवस्तू स्वीकारणाऱ्याने सदर भेटवस्तूचा स्वीकार केला आहे आणि

(३) हिबानामाशी संबंधित भेटवस्तूचा ताबा, भेटवस्तू स्वीकारणाऱ्याला देण्यात आला आहे.

♦ हिबानामा संबंधित भेटवस्तू स्वीकारणाऱ्याकडून:

(१) हिबानामा संबंधित भेटवस्तू देणाऱ्याने त्याला भेटवस्तू देण्याबाबत घोषणा केली होती.

(२) हिबानामाशी संबंधित भेटवस्तूचा त्याने स्वीकार केला आहे आणि

(३) हिबानामाशी संबंधित भेटवस्तूचा ताबा त्याला देण्यात आला आहे.

♦ आणि हिबानामावर, हिबानामा करून देणार, हिबानामाचा लाभार्थी तसेच दोन साक्षीदारांची स्वाक्षरी आहे याची खात्री करून त्यानंतरच उक्त पत्राचा उल्लेख करून 'हिबानामा' संबंधी फेरफार नोंद नोंदविणे आणि प्रमाणित करणे आवश्यक आहे.




धन्यवाद